
ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

(B) Dr. Namdeo Shingare
(Marathi)

VOLUME - I ISSUE - I
April to june 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

137

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | 85 व्या अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनाध्यक्ष मा.श्री.सुरेश खरे यांच्या अध्यक्षीय भाषण | प्रा. श्री. वाव्हळ नरेंद्र पांडुरंग | 108-111 |
| 29 | इतिहासाची शेकात्मिक कथा:जुबा | प्रा.मुतवल्ली मैजोद्दीन | 112-117 |
| 30 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षणिक विचार | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 118-123 |
| 31 | उत्तम कांबळे यांच्या पारध्याची गाय या साहित्यकृतीचा संक्षिप्त मागोवा | प्रा. डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे<br>श्री रामदास धोंडिबा टेकाळे | 124-126 |
| 32 | शेतकरी संघटनेची चळवळ : सामर्थ्य आणि मर्यादा | प्रा.डॉ. गजानन जाधव | 127-129 |
| 33 | मराठी साहित्यात असलेलेकादंबरी वाङ्‌मयाचे स्वरुप व महत्व | सारिका संदिपान फरांडे | 130-134 |
| 34 | दलित आत्मकथेत आलेली शाळेतील अस्पृश्यता | प्रा. डॉ.नामदेव शिनगारे | 135-139 |
| 35 | सांस्कृतिक मूल्यांची जोपासणा करणारी दीर्घ किवाता :शेणाला गेलेल्या पोरी | प्रा.बाजीराव कृष्णाजी पाटील | 140-148 |
| 36 | युद्ध नको बुद्ध हवा | डॉ. पुरोषत्तम गुणवंतराव पखाले | 149-151 |
| 37 | अनुवादित साहित्य तंत्र आणि स्वरुप | डॉ. विठ्ठल केदारी | 152-155 |
| 38 | टोपी शुक्ला में चित्रित आधुनिक समस्याएँ | प्रा. कलशेट्टी महादेव काशिनाथ | 156-159 |
| 39 | आपका बंटी उपन्यास में चित्रित बाल मनोविज्ञान | डॉ. सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 160-163 |
| 40 | बुद्ध वाणी में पाली | प्रशांत हाबु शिंदे | 164-167 |
| 41 | भारतीय समाज और दलित जीवन | गायकवाड रंजना शिवाजीराव | 168-173 |
| 42 | तुलसीदार के काव्य की प्रासंगिकता | डॉ. बोईनवाड एन.एन | 174-177 |
| 43 | भारतातील सर्वाजनिक सहभागाचे मॉडेल Rural Developent | डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड | 178-182 |
| 44 | 19 व्या शतकाचा प्रारंभ आणि महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मीक घडामोडी | प्रा.डॉ.जाधवर बी.डी. | 183-185 |
| 45 | रांजणी गावातील नागशिल्प | डॉ.सावंत के.डी. | 186-188 |
| 46 | राजर्षी शाहूमहाराज यांचे स्त्री शिक्षणविषयक कार्य | प्रा.राजाभाऊ चव्हाण | 189-192 |
| 47 | नविन कृषी कायदे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती | प्रा. डॉ. मुजमुले बी. एस. | 193-197 |
| 48 | महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितिचा कार्यात्म आढावा : सातारा जिल्हा | सुनिता बनकर | 198-201 |
| 49 | बी.एड द्वितीय वर्ष आंतरवासिता ऑनलाईन माध्यमातुन उपक्रम व परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ. वैशाली शा. कंकाळे | 202-203 |
| 50 | कोकण आदिवासी जमातीची निसर्ग संस्कृती आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास | प्रकाश महादू गावित | 204-207 |
| 51 | जयपूर -अत्रोली घराण्याची परंपरा व वास्तवता यांचा अभ्यास | डॉ. विनोद ठाकूर देसाई | 208-21 |


138

# दलित आत्मकथेत आलेली शाळेतील अस्पृश्यता

प्रा. डॉ.नामदेव शिनगारे
मराठी विभाग
महिला महाविद्यालय,गेवराई

**प्रस्तावना :-**

साठोत्तरी कालखंडानंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक प्रवाह उदयाला आला.स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान ही दलित साहित्याची मूलात्म प्रेरणा वा अंत:प्रेरणा ठरते. 'डॉ.आंबेडकर' हे दलित साहित्याचे प्रेरणामूल्य तर साक्षात दलित जीवन ही दलित साहित्याची आविष्कारभूत चिरप्रेरणा आहे असे म्हणता येईल.

कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात आणि जीवनाच्या घडणीत साहित्याचाही वाटा असतो.कोणताही साहित्य प्रवाह हा एकाएकी व उगीच निर्मान होत नाही.त्याच्या निर्मितीमागे काही कारणे असतात.प्रेरणा प्रयोजने,प्रवृती हेतू असतात.बदलती नवी साहित्यदृष्टी,बदलते साहित्यमूल्य जसे याच्या मुळाशी असते,तसेच बदलते जीवन,बदलता संदर्भ ,बदलत्या राजकीय,सामाजिक घडामोडी याही असतात.काळाबरोबर साहित्य बदलते. साहित्यात त्या काळाचे प्रतिबिंब कमी अधिक प्रमाणात उमटलेले असते. काळाच्या परिणामापासून साहित्य वेगळे राहू शकत नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार झाला.उपेक्षित समाजाला शिक्षण मिळाल्यामुळे स्वत्वाची जाणीव झाली.त्यामुळे दलित समाज ढवळून निघाला आणि दलित साहित्याचा प्रवाह निर्माण झाला.कथा,कादंबरी, नाटक,कविता या साहित्यप्रकाराबरोबरच ज्या साहित्यप्रकाराने आपल्या गतायुष्यातील चांगल्या वाईट आठवणी रेखाटल्या त्या आत्मकथनांच्या माध्यमातून.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाही शाळेत असताना अस्पृश्यतेचे अनेक दाहक अनुभव वाट्याला आले. संस्कृतची आवड असूनही केवळ अस्पृश्य असल्या कारणाने मला पर्शियन भाषेकडे निरूपायाने धाव घेणे भाग पडले.ते म्हणतात, 'मला संस्कृत भाषेचा अत्यंत अभिमान आहे व ती मला चांगली यावी अशी अजूनही माझी इच्छा आहे. संस्कृतचा अभिमान व संस्कृत भाषा आपल्याला चांगली अवगत असावी याविषयी माझ्या अंत:करणात विलक्षण तळमळ असतानाही शिक्षकाच्या कोत्या वृत्तीमुळे व संकुचित दृष्टीकोणामुळे मला संस्कृत भाषेला मुकावे लागले.१

अशी खंत ते व्यक्त करतात.हीच अवस्था सबंध अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या दलितांची होती.

'बलुतं'मधील शाळेतील प्रसंग लेखक सांगतात, 'तेव्हा शाळा मारूतीच्या देवळात भरत असे.महार मुलं पायरीवर बसत.एकदा ब्राह्मन मास्तरांनी तात्याला रूळ फेकून मारलेला.तात्यानं काय करावं ? तो रूळ तसाच मास्तरांच्या दिशेला फेकला.मास्तरांना खोक पडली.मास्तरांचं रक्त पाहून तात्या महारवाड्यात पसार झाला.तेव्हापासून तात्या शाळेतच गेला नाही.२

खऱ्याअर्थाने तात्याने भिरकवलेला रूळ हा तत्कालीन व्यवस्थेवर आहे. मास्तर हा निमित्तमात्र आहे.

प्र.ई.सोनकांबळे अस्पृश्यतेच्या अनेक आठवणी सांगतात.तहाण लागली म्हणून लहानगा प्रल्हाद एका खड्डयातले साचलेले पाणी पीत असतो.कोणी पाहील की काय ही भीती त्याच्या मनात असते.तो महार आहे ना जिथे सवर्णांची गुरे पाणी पितात ते पाणी पिऊन तो बाटवीत होता.आणि पाणी पीत असताना एक शेतकरी येतो,रोखतो,सांगतो.असं करू नको पाणी बाटवू नको.मार पडल.......३

असाच प्रसंग नामदेव व्हटकर कथा माझ्या जन्माची या आत्मकथेत सांगतात,लहाण मुलांचा वर्ग मारूतीच्या देवळात भरायचा.

आम्ही खालच्या कट्ट्यावरची अस्पृश्यांची पोरे काही चुकलो किंवा आम्ही दंगा केला तर मास्तर बसल्या ठिकाणाहून तो रूळ आम्हाला फेकून मारत असत.तो कसा लागेल,कुठे लागेल याचा आमच्या बाबतीत विचार करण्याची फारशी गरज त्यांना नसायची.पुन्हा तो आम्हावर फेकलेला रूळ ज्या पोराला मारला असेल त्यानेच उठून वरच्या गाभाऱ्यातील मास्तरांना वरून-दुरून अलगद टाकल्यागत दिला पाहिजे. तो परत देताना मास्तरांना शिवाशिव होता कामा नये,अशी दक्षता आम्हाला घ्यावी लागायची.४

शंकरराव खरातही आपल्या बालपणीचा शाळेतील पहिल्या दिवसाचा प्रसंग 'तराळ-अंतराळ' या त्यांच्या आत्मकथनात सांगतात. "मी सरळ शाळेच्या उघड्या सोप्याच्या पायऱ्या चढून आत गेलो.तिथं बसलेल्या लहाण मुलांच्या रांगेत बसलो.पुढं नवी पाटी ठेवली.ती मुलांची रांग वाण्या-बामणाच्या-उदम्यांच्या मुलांची होती,त्याच रांगेत मी सरळ बसलो.मला पाहताच वाण्या-बामणाची मुले एकदम टवकारली.उठून एकदम झटकन बाजूला हाटली.एकाएकी साप-विंचू निघावा तशी त्यांची धावाधाव झाली.ती बाजूला पळाली,माझ्याकडं ती एखाद्या जंगली जनावरागत बघू लागली.

'आरं हा तर म्हारड्याचा !'

'म्हारड्याची जागा पायरीखालची !'

'च्यायला ! म्हारा-मांगाची कार्टी पायरीच्या खाली बसतात.पण हे कार्ट वर कसं....?'

'ये म्हारड्या,आमाला बाटवतोस का ?'

'शिंदळीच्या आमाला शिवू नको ! आमाला विटाळ होईल.'

'याला लाथा घाला ! हाणा भडव्या-म्हारड्याला !'

'भडव्याला मारा ! ढकला खाली !'५

खऱ्या अर्थाने इथल्या व्यवस्थेने अस्पृश्यतेच्या बाबतीत मांडलेला खेळच होता.आणि त्या खेळाकडे गुमान बघण्याशिवाय पर्याय नव्हता.

'उपरा'मध्ये लक्ष्मण माने यांना जातीयतेतून आलेले कितीतरी दु:ख त्याने भोगले होते.अस्पृश्यतेच्या ज्वाळेने त्यांचेही बालपण करपलेले होते.

लक्षाला शाळेच्या बाहेर बसून शिकावे लागले.भरल्या पंगतीमधून ताटावरून उठावे लागले.ओंजळीने पाणी पितांना अंगावर पाणी उडू लागले म्हणून सावरून बसायला जाताना तोल जाऊन पाण्याच्या टिपाला स्पर्श झाला तर शिव्या खाव्या लागल्या आणि त्याच्यातील पाणी ओतून देण्यात आले. या सर्वातून तावून सुलाखून निघणाऱ्या लक्ष्मणचे व्यक्तिचित्र लक्षणीय आहे.६

'मरणकळा'या आत्मकथनात जनाबाई कचरू गिऱ्हे शाळेच्या पहिल्या दिवशी आलेला अनुभव अत्यंत भयंकर होता.शाळेच्या समोर बाप लेक उभी असताना गावातले लोक जमा झाले.

आशातच एक गावातली बाई आली आन् मनाय लागली, 'काय बया,ही भिकाऱ्याची ,सेमंडी मेंमडी पोरगी साळात बसायची काय.हे तर नवलच बया.मास्तर, ह्या पोरीला आमच्या पोरीच्या शेजाला बसू नका बया.नायतर हाकला त्या पोरीला. 'हे आयकून म्या रडाय लागली आन् मनाय लागली, 'बाव,नगं मला शाळा.चल पालावर !७

अज्ञान-अंधकारात असणाऱ्या आणि मुलींना शिकविणे म्हणजे शिंदळकी असा समज असणाऱ्या गोपाळ समाजातील एक मुलगी शिक्षण घेते.पाथर्डी तालुक्यातील खेर्डे गावच्या पांडुरंग पाटील यांच्या सांगण्या-वरून लेखिकेचे वडील शाळेत पाठवितात. अस्पृश्यतेचे विखारी डंख सोसून गोपाळ समाजाच्या मुलीने इथल्या व्यवस्थेला न जुमानता आपलं आयुष्य घडविले व समाजा समोर एक आदर्श उभा केला.

'जिणं आमुचं'या आत्मकथनाच्या माध्यमातून बेबी कांबळे यांनीही शाळेमध्ये आलेल्या अनुभवांचे मोजकेच चित्रण केले आहे.

त्यांना कन्या शाळेत घेतले तेव्हा सगळे वर्ग सवर्ण मुलींचे आयुष्यात प्रथमच या त्यांना बाटवायला निघालेल्या, "वर्गात आम्हाला पाहताच आम्ही रक्तपितीने नासलेली, सडलेली, रक्त,पू गळणाऱ्या व्यक्तीसारखी आम्ही त्यांना दिसत असू." हा शाळेच्या पायरीवर पाय ठेवताच आलेला पहिला अनुभव बालमनात चीडच अधिक निर्माण करणारा आहे.८

'अक्करमाशी'मध्ये शरणकुमार लिंबाळे यांचं बालपणही इतर अस्पृश्य मुलांसारखेच भयावह गेले.ते म्हणतात 'मला माझं बालपण आजबी भयावह वाटतंय'. शाळेचा प्रसंग

सांगताना ते म्हणतात,जवा शाळा मारवाड्याच्या वाड्यात भरायची,तवा आमी खाली बसायचो.पोरं वसरीवर बसायचे.मास्तर ढेल्जंत बसून गावातल्या पोरांना गणित समजावून सांगायचा. आमी खाली जोड्याजवळ.भवताली चपला सोडलेल्या.म्या मास्तरच्या चपलाला शिवायाचा न्हैय.चपलांना आपला ईटाळ व्हईल वाटायचं.गुर्जीच्या चपला मला रामाच्या पादुकावानी वाटायच्या. ९

'माज्या जल्माची चित्तरकथा'या शांताबाई कृष्णाजी कांबळे यांच्या आत्मकथनात लेखिकेला आलेला शाळेतील अस्पृश्यतेचा प्रसंग व बालमनाला पडलेला प्रश्न अत्यंत बोलका आहे.

'मी तिसरीत गेले.आमची शाळा बदलली.साबळ्याच्या वाड्यात तिसरीचा वर्ग हुता.तिथं आमी तिसरीच्या वर्गात गेलो.तिसरीच्या वर्गाला पाटील मास्तर शिकवायला हुतं.त्यानी आमाला बाहीर बसवलं.ते आमाला शिवून घेत नव्हतं.पोरांना पन शिवू देत नव्हतं.आमचं काय चुकलं तर ते लांबनंच छडी मारायचं.पाट्या तपासताना आमाला पाट्या खाली ठिवायला सांगायचं.त्यांनी पाटी तपासल्यावर खाली ठेवायचं.मग आमी पाटी घेत हुतं.मास्तराला शिवलेलं चालत नव्हतं.'

मी आयला म्हनलं, "आये,मास्तर पन मानूस हाय.आपूनबी मानूस हाय.मग मास्तर कसा आपल्याला शिवून घेत नाय ?"१०

'बिराड'या अशोक पवार यांच्या आत्मकथनातून बेलदार या भटक्या जमातीचे चित्रण हे कोणत्याही सहृदयी माणसाच्या काळजात घर करून बसते. भीक आणि भूक,दारिद्य आणि गुन्हेगारी या चक्रात सापडलेल्या दु:खाची ही करूण कहाणी आहे.पोटाच्या भुकेतून लागलेला शिक्षणाचा आणि शाळेचा शोध लेखक आपल्या शब्दात सांगतात.

"दुपारच्याला साळा सुटल्यावर मास्तर आन् मास्तरीन साळंतून पालापसल्या हिरीवर जेवायला येयाचे.जेवण झाल्यावर उरलेली भाकर आन् कोलड्यास हामाला देयाचे.मला तर लयी खावावं वाटायचं.ते रोजच जेवायला येयाचे.जेवायला आल्यावर मी,आय तिथच घुटमळायचो"११

'बेरड'या भीमराव गस्ती यांच्या आत्मकथनातूनही त्यांच्या शालेय जीवनातील प्रसंगही इतर अस्पृश्य समजल्या गेलेल्या मुलांप्रमाणेच बाल मनावर परिणाम करणारे होते.

"सरका की रे बेरडांच्या पोरानू ! मस्ती आलीया व्हय ?---आवं मास्तर,यासनं लगवा की दोन-तीन रठ्ठ !बगा वाट बी सोडीत नैत !" हे चावडीवरील हनुमंताच्या दर्शनाला येणाऱ्या कुळवाड्यांचे उद्गार तरी काय सांगता ? त्यांच्या या उद्गारातून स्वत: उच्च असल्याची मग्रुरी आणि बेरड हे नीच असल्याने ते तुच्छ असल्याचीच भावना प्रतीत होते. १२

थोडक्यात दलित आत्मकथनातून जो तळातला उपेक्षित वर्ग होता.त्याच्या अनुभव विश्वाची वेगळी ओळख होते. आपले अनुभवविश्व मांडताना अनेकांच्या आत्मकथनातून बालपण येते. बालपण हे निरागस असते. संस्कारक्षम असते. त्याच्यावर जसे संस्कार करावेत तसा तो घडत असतो.



142

संस्कारक्षम बालमनावर तत्कालीन कालखंडात जातीव्यवस्थेचे, वर्णव्यवस्थेचे दाहक चटके बसले होते आणि ते चटके जन्म घेतल्यानंतर अगदी बालपणापासूनच भोगावे लागले. त्याचे बालपण खडतर होते परंतु या खडतर प्रवासातूनच पुढे नवे आयुष्य उभे राहिले. हे जरी खरे असले तरी अनेक आत्मकथनातून बालचित्रण आलेले आहे. शिक्षणासारख्या पवित्र समजल्या गेलेल्या क्षेत्रातही अस्पृश्यतेचे दाहक अनुभव शिक्षण घेत असताना वेळोवेळी आत्मकथनकारांच्या बालभावनांना बसतात. ही खरी इथल्या व्यवस्थेची शोकांतिका आहे.

संदर्भ ग्रंथ


१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर-माझी आत्मकथा,संपादक-ज.गो.सन्त,तथागत प्रकाशन, नांदेड-पृ.क्र.१४
२. पवार दया, 'बलुतं'ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. सहावी आवृत्ती पृ.क्र.२६
३. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी' , चेतना प्रकाशन, औरंगाबाद -पृ.क्र.४०
४. व्हटकर नामदेव, 'कथा माझ्या जन्माची'-प्रकाशन मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई,पहिली आवृत्ती ऑगस्ट १९८३ पृ.क्र.१६
५. खरात शंकरराव, 'तराळ-अंतराळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती :१९८१पृ.क्र.७०
६. मुलाटे वासुदेव, 'दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. आवृत्ती पहिली :१९९९,पृ.क्र.११६
७. गिऱ्हे जनाबाई, 'मरणकळा', गिऱ्हे प्रकाशन, औरंगाबाद.तृतीय आवृत्ती :१८ फेब्रुवारी २००७,पृ.क्र.३०
८. मून नरेंद्र, 'जिणं आमुचं आणि वाटा पळवाटा एक आकलन', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.पृ.क्र.४७
९. लिंबाळे शरणकुमार, 'अक्करमाशी',दिलीपराज प्रकाशन,पुणे.सातवी आवृत्ती. ६ डिसेंबर २०१४पृ.क्र.२२
१०. कांबळे शांताबाई कृष्णाजी, 'माज्या जल्माची चित्तरकथा' सुगावा प्रकाशन, पुणे चौथी आवृत्ती.जुलै २००९ पृ.क्र. १२.
११. पवार अशोक, 'बिराड',मनोविकास प्रकाशन,पुणे,चौथी आवृत्ती पृ.क्र.८२
१२. मुलाटे वासुदेव, 'दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.आवृत्ती पहिली :१९९९,पृ.क्र.२२५